पुणे पोलीस
Pune Police

जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph**.020 / 26122478

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक -६०२ दिनांक - ०७/०८/२०२३**

खंडणी विरोधी पथक २,गुन्हे शाखा,पुणे शहर

## देशी बनावटीचे ०२ कट्टे व ०४ जिवंत काडतुसे बाळगणा-या रेकॉर्डवरील गुन्हेगारास केले जेरबंद

पुणे शहरामध्ये अग्निशस्त्रे जवळ बाळगणारे,शस्त्र पुरविणारे गुन्हेगारांवर लक्ष ठेवून कठोर कारवाई करणेबाबतचे निर्देश मा.पोलीस आयुक्त,श्री.रितेश कुमार यांचेकडून गुन्हे शाखेकडील अधिकारी यांना प्राप्त झालेले होते.

पोलीस निरीक्षक,श्री.प्रताप मानकर,खंडणी विरोधी पथक-२,गुन्हे शाखा,पुणे शहर यांचे देखरेखीखाली पथक माहिती काढीत असताना,पोलीस अंमलदार,सुरेंद्र जगदाळे व सचिन अहिवळे यांना मिळालेल्या गोपनीय माहितीचे आधारे अग्निशस्त्र बाळगणारा रेकॉर्डवरील गुन्हेगार **साहस विश्वास पोळ,वय-२४ वर्ष,रा.सिध्दी विनायक अपार्टमेंट,जे बिल्डींग,फलॅट नं.१०१,वडकी गाव, पुणे,मुळगाव-वीर परींचे,ता.पुरंदर,जि.पुणे** यास उरुळी-देवाची,पुणे परिसरामध्ये सापळा रचून त्याचे ताब्यातून देशी बनावटीचे एकुण ०२ पिस्टल व ०४ जिवंत काडतूसे असा ४२,०००/- रू किचे शस्त्र जप्त करून त्याचेविरुध्द **लोणी-काळभारे पोलीस स्टेशन येथे गुरनं.५०२/२०२३, महा. पो.का.क.३७(१)१३५,आर्म ॲक्ट ३(२५)** अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

नमूद आरोपी हा सध्या पोलीस कस्टडीत असून,पुढील तपास पोलीस उप-निरीक्षक, मोहनदास जाधव हे करीत आहेत. त्याचेविरुध्द यापूर्वी हडपसर पोलीस स्टेशन येथे दुखापतीचा गुन्हा दाखल आहे.

सदरची कामगिरी ही मा.पोलीस आयुक्त,श्री.रितेश कुमार, मा.पोलीस सह आयुक्त,श्री. संदिप कर्णिक,मा.अपर पोलीस आयुक्त,(गुन्हे),श्री.रामनाथ पोकळे,मा.पोलीस उप-आयुक्त,(गुन्हे),श्री.अमोल झेंडे, मा.सहा.पोलीस आयुक्त,गुन्हे-२,श्री.सतिश गोवेकर यांचे मार्गदर्शनाखाली खंडणी विरोधी पथक-२,गुन्हे शाखेकडील पोलीस निरीक्षक,श्री.प्रताप मानकर, सहा.पो.निरी. चांगदेव सजगने, पो.उप-निरी.मोहनदास जाधव, पोलीस अंमलदार, सचिन अहिवळे, सुरेंद्र जगदाळे, प्रदिप शितोळे,विजय गुरव, संग्राम शिनगारे, ईश्वर आंधळे,अनिल मेंगडे,राहुल उत्तरकर, सैदोबा भोजराव,चेतन आपटे, अमोल पिलाणे,शंकर संपते, किशोर बर्गे,चेतन शिरोळकर,प्रदिप गाडे, आशा कोळेकर यांनी केलेली आहे.